| MHJN060020492022 | **प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, भोकरदन यांचे न्यायालयातील**<br>(पिठासीन अधिकारी मयुरेश आर. काळे) |
|---|---|

**दिनांकः ०४.०५.२०२६**
**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.७८१/२०२२** **निशाणी–२६**
(पोलीस ठाणे भोकरदन गु.र.क्र.८३/२०२२)

अभियोग पक्ष :– महाराष्ट्र सरकार तर्फे
पोलीस ठाणे अंमलदार,
पोलीस ठाणे भोकरदन.

प्रतिनिधित्व :– सहा. सरकारी अभियोक्ता श्री. ए. एन. गवळी.

**–विरूध्द–**

आरोपी :– १. योगेश तुकाराम गायकवाड,
वयः ३३ वर्ष,
रा. ईरला, ता. जि. बुलढाणा

प्रतिनिधित्व :– विधीज्ञ श्री. पी. एन. कड

**''भाग ब''**

| | |
|---|---|
| गुन्हा दिनांक | ११.०१.२०२२ |
| प्रथम खबर अहवाल दिनांक | ०९.०२.२०२२ |
| दोषारोप दिनांक | ०२.०३.२०२३ |
| पुरावा सुरू झाल्याचा दिनांक | १८.०३.२०२४ |
| न्यायनिर्णय राखीव दिनांक | ०४.०५.२०२६ |
| न्यायनिर्णय दिनांक | ०४.०५.२०२६ |
| शिक्षा दिल्याचा दिनांक, असेल | –– |

## आरोपीचा तपशील

| अ. क्र. | आरोपीचे नाव | अटक दिनांक | जामीनावर सोडल्याचा दिनांक | दोषारोप | शिक्षा दिली किंवा मुक्त केले | किती शिक्षा झाली | पुर्वी तुरूंगात असल्यास तो काळ वजा केलेला असल्यास |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | योगेश तुकाराम गायकवाड | २४.०२.२०२२ | २४.०२. २०२२ | ३०४अ, २७९, ३३७, ३३८ भा.दं.वि. | निर्दोष मुक्त केले | -- | -- |

## ''भाग क''

## अभियोग पक्षाच्या साक्षीदारांची यादी

| साक्षीदार क्र. | साक्षीदारांचे नाव | साक्षीदारांचा प्रकार | निशाणी क्र. |
|---|---|---|---|
| सा. क्र. १ | शिवाजी मारोती मिसाळ | फिर्यादी | १६ |
| सा. क्र. २ | शेख रईस मोहम्मद गौस | पंच साक्षीदार | २२ |
| सा. क्र. ३ | शेख हारुन शेख इब्राहिम | पंच साक्षीदार | २४ |
| सा. क्र. ४ | सत्यवान शेनुबा मिसाळ | पंच साक्षीदार | २६ |
| सा. क्र. ५ | संजय भिका चंदनसे | पंच साक्षीदार | २८ |
| सा. क्र. ६ | पंजाब माणिकराव मिसाळ | साक्षीदार | ३३ |

## अभियोग पक्षातर्फे दाखल कागदोपत्री पुरावा

| निशाणी क्र. | कागदपत्राचे वर्णन |
|---|---|
| १७ | फिर्याद |
| २३ | पंचनाम्यावरील सही |
| २५ | पंचनाम्यावरील सही |

| | |
|---|---|
| २७ | पंचनाम्यावरील सही |
| २९ | पंचनाम्यावरील सही |

## न्यायनिर्णय

(घोषित दिनांक ०४.०५.२०२६)

सदरची संपरीक्षा आरोपीविरुद्ध भारतीय दंड संहिता कलम ३०४–अ, २७९, ३३७, ३३८ अन्वये दंडनीय असलेल्या अपराधान्वये चालविण्यात आली.

**अभियोगपक्षाचे थोडक्यात कथन खालीलप्रमाणेः–**

०२. दिनांक ११.०१.२०२२ रोजी आरोपीने त्यांच्या ताब्यातील वाहन क्र.एम.एच.–२१–बी.एम.–२९४७ हे बेदरकारणे व निष्काळजीपणे चालवुन महादु मारोती मिसाळ यांच्या मृत्युस कारणीभुत ठरले. तसेच आरोपीच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने चालवुन मयत महादु मिसाळ यांना जबर दुखापत पोहोचवली.

०३. सदर गुन्ह्याची फिर्याद गु.र.क्र.८३/२०२२ अन्वये भोकरदन पोलीस ठाण्यात नोंदविण्यात आली.

०४. आरोपीविरुद्ध पुरेसा पुरावा निष्पन्न झाल्याने तपासीक अंमलदार श्री. एम. पी. सुरडकर, यांनी दोषारोपपत्र दाखल केले.

०५. भारतीय दंड संहिता कलम ३०४–अ, २७९, ३३७, ३३८ या अपराधाकरीता आरोपीविरुद्ध दोषारोप नोंदविण्यात आला.

०६. आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहीता कलम ३१३ अन्वयेचे निवेदन निशाणी क्र.२४ कडे नोंदविण्यात आले.

०७. सरकार पक्षातर्फे व आरोपींतर्फे युक्तीवाद ऐकला.

०८. प्रस्तुत खटल्याच्या न्यायनिर्णयासाठी माझे विचारार्थी खालील प्रमाणे मुद्दे

उपस्थीत होतात. त्यावर माझे निष्कर्ष व कारणमिमांसा पुढीलप्रमाणे–

| अ.क्र. | विचारार्थी मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| ०१. | अभियोगपक्ष हे सिद्ध करतो का की, दिनांक ११.०१.२०२२ रोजी आरोपीने सार्वजनिक रस्त्यावर त्यांच्या ताब्यातील वाहन क्र.एम.एच.–२१–बी.एम.–२९४७ बेदरकारपणे चालवुन पाठीमागे बसलेला महादु मारोती मिसाळ याला दुचाकीवरुन खाली पाडले व भारतीय दंड संहीता कलम २७९ अन्वये अपराध केला ? | नाही. |
| ०२. | अभियोगपक्ष हे सिद्ध करतो का की, आरोपीने त्यांच्या ताब्यातील वाहन निष्काळजीपणे चालविले व महादु मारोती मिसाळ यांच्या मृत्युस कारणीभुत ठरले व भारतीय दंड संहीता कलम ३०४–अ अन्वये अपराध केला ? | नाही. |
| ०३. | अभियोगपक्ष हे सिद्ध करतो का की, आरोपीने त्यांच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने चालवुन महादु मारोती मिसाळ यांना खाली पाडुन त्यांची व्यक्तीगत सुरक्षितता धोक्यात आणणारी कृती केली व भारतीय दंड संहीता कलम ३३७ अन्वये अपराध केला ? | नाही. |
| ०४. | अभियोगपक्ष हे सिद्ध करतो का की, आरोपीने त्यांच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने चालवुन महादु मारोती मिसाळ यांना जबर दुखापत पोहोचवली व भारतीय दंड संहीता कलम ३३८ अन्वये अपराध केला ? | नाही. |
| ०५. | अंतिम आदेश काय ? | आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात येते. |

## कारणमीमांसा

### विचारार्थी मुद्दा क्र.१ ते ४

०९. आरोपीविरुद्ध नमुद दोषारोप सिद्ध करण्यासाठी अभियोगपक्षातर्फे आरोपीने त्यांच्या ताब्यातील वाहन क्र.एम.एच.–२१–बी.एम.–२९४७ हे बेदरकारणे व निष्काळजीपणे चालवुन महादु मारोती मिसाळ यांच्या मृत्युस कारणीभुत ठरले, तसेच आरोपीच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने चालवुन मयत महादु यांना जबर दुखापत पोहोचवली या बाबी सिद्ध करणे आवश्यक आहे.

१०. शेख रईस मोहम्मद गौस (अ.सा.क्र.२), शेख हारुन शेख इब्राहिम (अ.सा.क्र.३), सत्यवान शेनुबा मिसाळ (अ.सा.क्र.४) व संजय भिका चंदनसे (अ.सा.क्र.५) जे या कामातील पंच साक्षीदार आहेत. त्यांनी त्यांच्या साक्षीमध्ये त्यांच्या समक्ष कोणताही पंचनामा झाला नसल्याचे कथन केले आहे. तसेच सदरचे साक्षीदार अभियोग पक्षास सहकार्य करत नसल्याने अभियोग पक्षातर्फे सदर साक्षीदारांना उत्तर सुचक प्रश्न विचारण्यात आले. त्यांनी सदरच्या प्रश्नांची नकारार्थी उत्तरे दिली.

११. तसेच शिवाजी मारोती मिसाळ (अ.सा.क्र.१) जे या कामातील फिर्यादी आहेत त्यांनी अपघात कसा घडला हे त्यांना माहित नसल्याचे, फिर्यादीमधील मजकुर वाचुन पाहिला नसल्याचे व अपघातग्रस्त मोटारसायकल बाबत माहिती नसल्याचे कथन केले आहे. तसेच साक्षीदार पंजाब (अ.सा.क्र.६) यांनी देखील अभियोग पक्षास सहकार्य केलेले नाही.

१२. तसेच प्रस्तुत कामी अभियोग पक्षातर्फे नमुद इतर साक्षीदारांच्या जबाबाचे अवलोकन केले असता ते देखील घटनेचे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार नसल्याचे दिसुन येते. प्रस्तुत कामी तपासिक अंमलदार यांना वारंवार साक्षी समन्स काढुनदेखील ते या कामी

हजर झाले नाहीत. सबब, अभिलेखावर दाखल पुरावा आरोपीविरुद्ध नमुद दोषारोप सिद्ध करण्यास उपयुक्त नाही. सबब, वर नमुद कारणांचा विचार करुन मी विचारार्थी मुद्दा क्र.१ ते ४ करीता निष्कर्ष नकारार्थी नोंदवत आहे.

**विचारार्थी मुद्दा क्र.५**

१३. या कामामध्ये जप्त एक दुचाकी क्र.एम.एच.–२१–बी.एम.–२९४७ चा अंतरीम ताबा हा कौतिक सदाशिव आगळे यांना दिल्याचे दिसुन येत आहे. अन्य कोणीही सदर दुचाकीचा ताबा न्यायालयासमक्ष मागितलेला नाही. सबब सदरचा ताबा त्यांचेकडे अपील कालावधीनंतर कायम करणे उचित राहील. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे–

## आदेश

१. आरोपी योगेश तुकाराम गायकवाड यांची भारतीय दंड संहिता कलम ३०४–अ, २७९, ३३७, ३३८ प्रमाणे शिक्षेस पात्र अपराध केल्याचे आरोपातून फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपीचा वैयक्तिक जात मुचलका व जामीन कदबा रद्द करण्यात येत आहे.

३. याकामी जप्त दुचाकी क्र. एम.एच.–२१–बी.एम.–२९४७ चा ताबा अपील कालावधीनंतर कौतिक सदाशिव आगळे यांचेकडे कायम करण्यात यावा.

४. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ अन्वये रक्कम रु.१५,०००/– चे जामीन बंधपत्र द्यावे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला.)

Digitally signed by MAYURESH RAJEEV KALE
Date: 2026.05.04 13:55:36 +0530

भोकरदन. (मयुरेश आर. काळे )
दिनांकः ०४.०५.२०२६ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
भोकरदन.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file Order/Judgment are same word to word as per the original Order/Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Steno | : | Smt. S. R. Ingle |
| Court | : | CJJD & JMFC, Bhokardan |
| Date | : | 04.05.2026 |
| Judgment/order signed by the Presiding Officer on | : | 04.05.2026 |
| Judgment/Order uploaded on | : | 04.05.2026 |